



# पारनेर दर्शन







वर्ष ३ अंक ७०, बुधवार ५ फेब्रुवारी २०२५ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये


## शेती, आरोग्याच्या प्रश्नावर खा. लंके आक्रमक

### संसदेत उठविला आवाज

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पानंतर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना खासदार नीलेश लंके यांनी शेती व आरोग्याच्या प्रश्नावर अर्थसंकल्पात तरतुद नसल्याविषयी लोकसभेत आवाज उठविला.**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका मांडत अर्थसंकल्पात सर्वसामान्य नागरीकांसाठी तरतुद केली नसल्याबद्दल खंत व्यक्त केली.

संसदेत बोलताना खा. लंके म्हणाले, धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे असते. केंद्र सरकारच्या आरोग्य धोरणात अनेक घोषणा करण्यात आल्या असल्या तरी त्यात काही गंभीर समस्या दुर्लक्षित करण्यात आल्या आहेत. आरोग्यासाठी सरकारने वाढीव निधीची घोषणा केली असली तरी ती अत्यल्प आहे. भारतासारख्या मोठया देशात सार्वजनीक आरोग्य सेवांमध्ये अधिक गुंतवणूक होणे आवश्यक असतानाही ही गुंतवणूक अपेक्षेपेक्षा कमी आहे.



■ खासदार नीलेश लंके यांनी संसदेमध्ये शेती तसेच आरोग्याच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले.

#### शासकीय रूग्णालयांमध्ये डॉक्टरांची संख्या वाढवा

ग्रामीण भागात प्राथमिक अरोग्य केंद्र, शहरी भागात जिल्हा रूग्णालय, सरकारी रूग्णालय सेवा अद्याप अपेक्षीत हव्या तेवढया नाहीत. अनेकदा रूग्ण रूग्णालयात गेल्यानंतर डॉक्टर तिथे उपस्थित नसतात. त्यासाठी जास्तीत जास्त डॉक्टर रूग्णालयांमध्ये उपस्थित असणे आवष्यक आहेत. वैद्यकिय सुविधा शासकीय रूग्णालयांमध्ये उपलब्ध नसल्याचे खा. लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

#### आरोग्यासाठी अधिकचा निधी हवा

आजकाल कॅन्सरसारख्या आजाराला लहान मुलांना सामोरे जावे लागत आहे. पाच दिवस, नऊ दिवसाच्या बालकाला लिव्हर ट्रान्स्फरसारख्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे यापुढील कालखंडामध्ये आरोग्यासाठी अधिक निधीची तरतुद करणे अपेक्षित असल्याचे खा. लंके म्हणाले.

#### प्रत्येक रूग्णालयात अतिदक्षता विभाग हवा

औषधे आणि संशोधन केंद्राकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी जास्तीत जास्त निधी देणे अपेक्षित असल्याचे सांगतानाच सन २०१९-२० च्या कालखंडामध्ये कोविडची महामारी आली. अनेकांना त्यात जीव गमवावा लागल्याचे खा. लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. हा अनुभव गाठीशी धरून सरकारने आरोग्य सेवेसाठी जास्त निधी मंजुर करणे आवष्यक आहे. प्रत्येक रूग्णालयात अतिदक्षता विभागाची सुविधा निर्माण करून देणे गरजेचे असल्याचे लंके यांनी सांगितले.

#### दुधाची भेसळ थांबवा

दुधामध्ये मोठया प्रमाणावर भेसळ होते. त्यावर कठोर कारवाई अपेक्षीत आहे. भेसळीमुळे लहान मुलांना कॅन्सरच्या आजाराला सामोरे जावे लागत असल्याकडेही खासदार नीलेश लंके यांनी लक्ष वेधले.

#### आयुष्यमान भारत खाजगी रूग्णालयांच्या हिताची

अर्थसंकल्पात आयुष्यमान भारत योजना पुढे रेटली जात असली तरी ही योजना खाजगी रूग्णालयांच्या फायद्याच्या ठरत आहेत. त्यातून सार्वजनीक आरोग्य सेवा दुर्बल होत आहे. सामान्य नागरीकांपेक्षा खाजगी वैद्यकिय रूग्णालयांना त्याचा फायदा होत असल्याचा आरोप खा. लंके यांनी केला.

#### परदेशात शासकीय रूग्णालयांत सुविधा

परदेशात गेल्यानंतर खाजगी रूग्णालयांपेक्षा शासकीय रूग्णालयांमध्ये अधिक सुविधा मिळत असल्याचे दिसून येते. मात्र आपला देश आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये अतिशय कमजोर आहे. उपचाराअभावी अनेक रूग्णांना त्यांचे जीव गमवावे लागतात असेही खा. लंके म्हणाले.

#### सामान्यांसाठी अनुदान वाढवा

शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यातून देण्यात येणा-या अनुदानातून रूग्णाच्या अजाराचा खर्चही भागत नाही. कॅन्सरसारख्या आजारासाठी ४० ते ५० लाख रूपयांचा खर्च येतो. लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी २० ते ३० लाख खर्च सांगितला जातो. किडनीच्या आजारासाठीही मोठा खर्च येतो त्यामुळे गरीब जनतेसाठी आरोग्यासाठी बजेट वाढविणे आवष्यक आहे.

खासदार नीलेश लंके, लोकसभा सदस्य

#### उत्पादन खर्चावर दुधाचा दर द्या

सरकार मोठया उद्योजकांना शेती क्षेत्रात आणत असल्याने लहान शेतक-यांचे नुकसान होण्याची भिती आहे. त्यासाठी शेतकरी वर्गासाठी बजेटमध्ये मोठया प्रमाणावर तरतुद होणे अपेक्षित आहे. दुध दरवाढीसंदर्भात केंद्र सरकारने अनेक योजना राबविणे अपेक्षित आहे. दुधाच्या उत्पादन खर्चावर हमीभाव देणे अपेक्षीत आहे. दुधाच्या उत्पादनासाठी ३५ ते ४० रूपये प्रतिलिटर खर्च येतो. उत्पादन खर्चावर दुधाचा दर ठरला पाहिजे अशी अग्रही मागणी खा. लंके यांनी केली.

#### शेतमालास आधारभुत किंमत, कर्जमाफी हवी

शेतकरी हिताकडे या बजेटमध्ये काहीही करण्यात आलेले नाही. शेतमालास आधारभुत किंमत मिळावी, खते, डिझेल तसेच बियाण्यांवरील अनुदानात कपात झाल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. त्यासाठी शेतकरी कर्जमाफी आणि सुधारित पीक विमा योजनेची शेतकरी बांधवांची अपेक्षा होती. मात्र बजेटमध्ये त्याकडे दुर्लक्ष झाले आहे.

खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

## महावितरणच्या योजनांना गती द्या

### खा. नीलेश लंके यांची मागणी

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**महावितरणअंतर्गत असलेल्या केंद्र सरकारच्या आर. डी. एस. एस. योजनेअंतर्गत सुरू असलेल्या योजनांना गती द्या अन्यथा सबंधित ठेकदारास ब्लॅक लिस्ट करा अशी आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय स्थायी उर्जा समितीच्या बैठकीत केली.**



केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभुमीवर खासदार श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये उर्जा क्षेत्राविषयी नवीन ध्येय धोरणे ठरविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यावेळी खासदार नीलेश लंके यांनी समितीचे सदस्य या नात्याने नगर दक्षिण मतदार संघातील महावितरणच्या विविध विषयांवर समितीचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना खासदार लंके यांनी सांगितले की, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील केंद्र सरकारच्या आर.डी.एस.एस.योजनेअंतर्गत १८६ फिडरचे काम सुरू असून ही योजना केंद्र सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेचा भाग आहे. वीज वितरण कंपन्यांच्या कार्यक्षमता आणि आर्थिक स्थैर्य सुधारण्याचा त्यामागे उद्देश आहे. नुकसान कमी करणे, पायाभुत सुविधा अद्यायवत करणे, विश्वासार्ह वीज पुरवठा सुनिश्चित करणे यावर या योजनेत भर देण्यात आलेला आहे. तसेच त्यात एच.टी. व एल. टी.लाईन विस्तारीत करणे, पोल उभारणे, नवे ट्रान्सफॉर्मर बसविणे व त्याअनुषंगाने सध्या कामे सुरू असून ही कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने खा. लंके यांनी यावेळी स्पष्ट केले.

#### दोन वर्षात १० टक्केही काम नाही !

केंद्र शासनाची ही योजना एप्रिल २०२३ मध्ये सुरू करण्यात आली असून सरकारच्या आरडीडीएसएस योजनेतून नगर जिल्हयात ३ हजार ३७४ कोटी रूपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये वीज वितरणाच्या पायाभूत सुधारणा, स्मार्ट मिटरींग आणि इतर संबंधित उपक्रमांचा समावेश आहे. ही कामे केवळ १८ महिन्यांच्या आत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. दोन वर्षात १० टक्केही काम पुर्ण झालेले नाही.

खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

#### एजन्सीला काळया यादीत टाका

या योजनेअंतर्गत राबविण्यामत येत असलेल्या कामांसंदर्भात आढावा घेण्यासाठी महावितरणच्या अधिक्षक अभियंता यांच्या कार्यालयात तीनदा बैठका घेण्यात आल्या. आर.डी.एस.एस.या योजनेसाठी केंद्र सरकारमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आला असून ही कामे वेळेत पुर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. ही कामे वितरीत करण्यात आलेल्या एन.सी. सी. इन्फ्रास्टक्चर या कंपनीकडून अतिशय संथ गतीने सुरू आहे. महावितरणकडून समज देण्यात येऊनही कामे पुर्ण होत नसल्याबद्दल खासदार लंके यांनी यावेळी नाराजी व्यक्त करताना या एजन्सीला काळया यादीत टाकण्याची आग्रही मागणी खा. लंके यांनी केली.

#### सब स्टेशनची कामे दर्जेदार हवीत

केंद्रीय निधीअंतर्गत कर्जत तालुक्यातील राजापुर, एरंडोली, पारनेर तालुक्यातील भाळवणी, पळवे तसेच नगर शहरातील सारसनगर, सावेडी या ठिकाणी सब स्टेशनर प्रस्तावित असून ही कामे लवकरात लवकर सुरू करावीत व ती वेळेत, गुणवत्तापुर्ण व दर्जेदार असावीत.

खासदार नीलेश लंके
लोकसभा सदस्य

## चारचाकीवाल्या लाडक्या बहिणींची चौकशी!

### अंगणवाडी सेविकांडून घरोघरी जाऊन पडताळणी
### दारात चारचाकी दिसल्यास योजनेचा लाभ होणार बंद



मुंबई : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आता अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. तुमच्या दारात चारचाकी वाहन असेल, तर अशा लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ सोडावा लागणार आहे. पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविकांच्या पडताळणीत कुटुंबीयांच्या नावावर चारचाकी वाहन असल्याचे निष्पन्न झाल्यास लाभार्थ्यांना अपात्र करण्यात येणार आहे. ही चारचाकी महिलेच्या नावावर नसेल, मात्र कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर असेल तरीही त्यांना या योजनेतून अपात्र ठरवले जाणार आहे. यासाठी आजपासून लाडक्या बहिणींच्या घरी जाऊन तपासणी केली जाणार आहे.**

लाडकी बहीण योजना ही उर्वरीत पान ३ वर








| Sr.No. | Post | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|---|
| 01 | Principal | Physics / Chemistry Biology / Math's | M.Sc./ B.Ed. | 01 |
| 02 | Asst. Professor | Physics | M.Sc. / B.Ed. | 01 |
| 03 | Asst. Professor | Math's | M.sc/ B.Ed. | 01 |
| 04 | Asst. Professor | Chemistry | M.Sc. B.Ed. | 01 |
| 05 | Asst. Professor | Biology | M.Sc. B.Ed. | 01 |
| 06 | Asst. Professor | IT / Computer Teacher | B.E. comp/ M.CS/ MCA | 01 |
| 07 | Asst. Professor | Marathi | M.A../ B.Ed | 01 |
| 08 | Asst. Professor | English | M.A../ B.Ed | 01 |
| 09 | Asst. Professor | Geog./ Economics | M.A../ B.Ed | 01 |
| 10 | Asst. Professor | Accountancy | M.Com /B.Ed. | 01 |
| 11 | Asst. Professor | OC | M.Com /B.Ed. | 01 |
| 12 | Asst. Professor | SP | M.Com /B.Ed. | 01 |





# युवा

# प्रेमविवाहानंतर सुखी संसार हवाय?



**आजच्या युगात स्वत ःच आपला जोडीदार शोधून लग्न करण्याची प्रथा सुरू झाली आहे आणि ठरवून लग्न करण्याची प्रथा मागे पडत चालली आहे. पण एका अर्थाने ते चांगलं सुद्धा आहेच, कारण जर जोडीदार ओळखीचा असेल तर त्याच्यासोबत संसार करणं सोप्पं जातं. शिवाय आपल्याला हवा असलेला व्यक्ती निवडण्याचं स्वातंत्र्य सुद्धा मिळतं. असा कोणी व्यक्ती मिळाला तर प्रथम प्रेमाचे दिवस सुरू होतात. थोडा काळ लोटला, विश्वासाचे नाते निर्माण झाले की मग लग्नाच्या गाठी जुळतात. पण लग्न झाल्यावर अशा काही गोष्टी आहेत ज्यांची काळजी दोन्ही उभयंतांनी घ्यायला हवी. नाहीतर हसतं-खेळतं नातं बिघडण्यास आणि मी हे लग्न का केलं, असा पश्चाताप वाटण्यास वेळ लागणार नाही. प्रत्येक प्रेमविवाह करणाऱ्या व्यक्तीला आशा असते की आपण आपल्या आवडत्या व्यक्तीसोबत सहज सुखाने आयुष्यभर संसार करू. पण अशी अनेक उदाहरणे तुम्हीसुद्धा पाहिली असतील ज्यांचे एकमेकांवर खूप प्रेम असते. पण लग्न झाल्यावर काहीच काळात ते विभक्त होतात किंवा त्यांच्यात लग्नाआधी सारखे प्रेम टिकत नाही. चला आज जाणून घेऊया की असे होऊ नये म्हणून कोणत्या गोष्टी टाळाव्यात...**

## पती- पत्नीचे नाते

लग्न झाल्यावर दोघांनी सुद्धा हे लक्षात घेतले पाहिजे की आता आपण बॉयफ्रेंड - गर्लफ्रेंड राहिलेले नसून पती- पत्नी झालो आहोत. सामाजिकदृष्ट्या मान्य असलेले हे नाते टिकवायचे असेल तर तुम्हाला अजून थोडे मॅच्युर व्हावे लागते. पण हा मॅच्युर पाळताना लग्नाआधीचे प्रेम सुद्धा सांभाळावे लागते. सतत होणारी भांडणे, रुसवे फुगवे हे पूर्वी सारखेच हाताळावे लागतात. जर त्यात खंड पडला तर नात्याला धक्का पोहोचायला वेळ लागणार नाही.

## संशय कमी करा

लग्नानंतर अनेकदा नाते तुटण्याचे कारण हे संशय असते. या काळात अचानक संशयाला वाव निर्माण होतो. कधी स्त्री तर कधी पुरुष आपल्या जोडीदाराबद्दल संशय व्यक्त करतो. जर संशय असेल तर तो सिद्ध करणारा ठोस पुरावा जमवून जोडीदाराला जाब विचारायला हवा. पण वारंवार उगाच तुम्हाला वाटतं म्हणून जोडीदारावर संशय घेणे त्याला तुमच्यापासून दूर घेऊन जाऊ शकतं. प्रेम आहे म्हणून एका मर्यादेपर्यंत तुमचा जोडीदार सहन करू शकतो. पण सततचा संशय वाढतच राहिला तर मात्र नातं तुटण्याची देखील भीती असते. त्यामुळे शक्य तितके सकारात्मक राहून जसे लग्नाआधी आपल्या जोडीदारावर प्रेम करायचा तसे प्रेम करा. त्या प्रेमात खंड पडू देऊ नका. हाच सुखी संसाराचा मूलमंत्र आहे. हा मूलमंत्र जे कपल पाळतं त्यांचं नातं सदा बहरत राहतं आणि आदर्श निर्माण करतं.

## जबाबदाऱ्या लक्षात घ्या



लग्न झाल्यावर जबाबदाऱ्या आयुष्य बदलून टाकतात. आता केवळ बाहेर फिरणे, भेटणे म्हणजे नाते नसते तर एकमेकांना आयुष्यभर सांभाळणे सुद्धा महत्त्वाचे असते. या काळात एकमेकांना प्राधान्य देणे सर्वाधिक गरजेचे असते. आपली बायको किंवा आपला नवरा हा आता आयुष्यातील महत्त्वाचा व्यक्ती झालेला असतो. जर दोघांनी एकमेकांना प्राधान्य दिले नाही तर नातं जास्त काळ नीट राहू शकत नाही. आपला जोडीदार लग्नानंतर आयुष्याचा अविभाज्य भाग बनतो. त्यामुळे त्याला सर्वाधिक महत्त्व देणे, अधिकाधिक काळ त्याच्यासोबत घालवणे महत्त्वाचे ठरते. जे कपल असेल करते त्यांच्या नात्यात कधी दुरावा येत नाही.

## बदल गरजेचा आहे

मी अशीच आहे आणि अशीच राहणार किंवा मी असाच आहे आणि असाच राहणार ही वृत्ती व हट्ट दोघांनी बदलणे गरजेचे आहे. लग्नानंतर अनेक गोष्टी बदलतात, परिस्थिती बदलते आणि त्यानुसार स्वतःमध्ये बदल घडवून आणणे आणि सुखी संसारासाठी शक्य तितके जुळवून घेणे गरजेचे आहे. ज्या कपलला हे जमले त्यांचा संसार कधीच वाईट होत नाही. पण जे आपला स्वभाव बदलायला तयार नसतात आणि कोणत्याही गोष्टीशी जुळवून घ्यायला तयार नसतात त्यांची मात्र पंचायत होऊ लागते आणि त्याचे भयंकर परिणाम नात्यावर होऊ शकतात.

## गृहीत धरू नका

लग्नानंतर एक चुकी अनेकांकडून होते की ते आपल्या जोडीदाराला गृहीत धरू लागतात. आपलं आपल्या जोडीदारावर प्रेम आहे आणि त्याला ते माहीत आहे. मग सारखं सारखं ते का व्यक्त करावं ही वृत्ती जोडीदाराला तुमच्या पासून दूर नेऊ शकते. या वृत्तीमुळे नात्यात ती ओढ राहत नाही, माया राहत नाही. साहजिकच जे प्रेम लग्नाआधी होतं ते हळूहळू कमी होत जातं आणि एक काळ असा येतो जेव्हा या नात्यात काही उरलं आहे की नाही असा प्रश्न मनात डोकावू लागतो. म्हणून शक्य तितकी नात्यातील ओढ कायम ठेवण्याचा प्रयत्न करा.

# लग्नानंतर पती, पत्नीच्या नात्यात होणारे बदल!

**लग्न हे एक असं नातं आहे जे खूपच समजूतदारपणे आणि कर्तव्यनिष्ठतेने निभवावे लागते. कधी कधी या नात्याची दोर मध्येच छाटली जाते तर कधी कधी आपण स्वप्नातही विचार केला नसेल असे काही बदल आपल्याला या नात्यात पहायला मिळतात. लग्नाआधी जोडप्यात फक्त प्रेम पूर्णत्वास नेण्याची, आपलं प्रेम सर्वश्रेष्ठ आहे हे जोडीदाराला पटवून देण्याचीच जबाबदारी असते. पण लग्न झाल्यानंतर खूप गोष्टी हळूहळू बदलू लागतात आणि त्या नात्याची व्याख्याही त्यासोबत बदलते. जसं की कुटुंबीयांची जबाबदारी, प्रेमाच्या नात्यात खरं उतरण्याची इच्छा, आर्थिक ताळमेळ, संसारातील कर्तव्ये, करियर हे सारं काही एकसाथ सांभाळणं म्हणजे जणू काही तारेवरची कसरतच असते. अशा परिस्थितीमध्ये आपला जोडीदार आपल्याला पूर्वीसारखा भासत नाही. तो कोणी वेगळाच माणूस असल्याचा भास आपल्याला होऊ लागतो. पण मंडळी, तुम्हाला माहित आहे का लग्नानंतर प्रामुख्याने बदलणाऱ्या गोष्टी कोणत्या? नसतील माहित तर आताच जाणून घ्या!**



## स्वप्नातून जागे व्हा...

लग्नानंतर आपलं नातं अधिक इंटरेस्टिंग होतं पण बऱ्याच गोष्टी अशाही असतात ज्याचा आपण स्वप्नातही विचार केलेला नसतो. लग्नाआधी जोडप्याच्या असलेल्या इच्छा, आशा-आकांशा, स्वप्न ही काही वेगळीच असतात. पण लग्नानंतर ती पूर्ण न झाल्याची रुखरुख मनास लागते. दोघांचीही जगण्याची पद्धत लग्नानंतर पूर्णतः बदलून जाते. लग्नाआधीच्या स्वप्नांना लग्नानंतरचे सत्य चांगलेच मुळापासून उखडून काढते आणि सतत सांगते की आता तरी स्वप्नातून जागे व्हा.

## लग्नाआधी, लग्नानंतर...

आपण बऱ्याच महिलांना असं बोलताना ऐकतो की लग्नानंतर आमचे पतीदेव पूर्णच बदलले आहेत. आता त्यांच्याजवळ माझ्यासाठी जराही वेळ नाहीये. बऱ्याच मुलींचा किंवा मुलांचा हा समज असतो की लग्नाआधी प्रेमात जसं सगळं सुरू होतं अगदी तसंच लग्नानंतर देखील सुरू रहावं पण असं काहीही घडत नाही. तसंच काहीसं सिनेमांच्या प्लानिंगबद्दलही होतं. लग्नाआधी 'फस्ट डे फस्ट शो' बघणारे जोडपे लग्नानंतर नेटफ्लिक्स आणि हॉट स्टार सारखे OTT प्लाटफॉर्म पाहणं सुरू करतात.

## जीवनातील शांतीत तडजोड

लग्नानंतर जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांचे ओझे वाढल्यामुळे आणि त्या गोष्टींच खूप बदल झाल्याने प्रत्येक जोडप्याला आपल्या छंद आणि शांततेने सुरू असलेल्या जीवनाशी थोडीफार तडजोड करावी लागते. नवऱ्याला जॉब किंवा व्यवसाय करतानाच कुटुंबीयांकडेही लक्ष द्यावे लागते. तसेच पत्नीला सासू सासरे, मुलं बाळं, एकत्र कुटुंबांत राहत असेल तर संपूर्ण कुटुंबीयांची काळजी घेण्यापासून घरातील सर्वच गोष्टींकडे अगदी बारकाईने लक्ष द्यावं लागतं. त्यामुळे दोघेही थकून भागून निवांत बसल्यावर फक्त आरामाचाच विचार करतात. आपले छंद आणि सारं काही दुय्यम स्थानावर मानू लागतात.

## पर्सनल स्पेसची व्याख्या

लग्नाआधी प्रेयसी आणि प्रियकराची भूमिका निभावताना प्रत्येक जोडपे आपला सोशल मीडियावरील प्रत्येक अकाऊंटचा पासवर्ड आपल्या जोडीदाराशी अगदी सहजतेने शेअर करू शकतो. पण लग्नानंतर ही गोष्ट तशी राहत नाही. पर्सनल स्पेसच्या नावाखाली नवरा- बायको दोघेही आपला पासवर्ड सिक्रेट ठेवतात. तसेच लग्नाआधी सतत २४ तास एकमेकांसोबत बाहेर फिरायला जाणं, हॉटेलमध्ये जाणं, सिनेमा बघायला जाणं या गोष्टी दररोज न चुकता करणारी कित्येक जोडपी लग्नानंतर सकाळी उठल्यावर आणि थेट झोपतानाच एकमेकांचे तोंड बघतात. एकतर कामात व्यस्त असल्याने किंवा पर्सनल स्पेस हवा असल्याने तरी..!

## लठ्ठपणात रुपांतर

लग्नाआधी ज्या सडपातळ, सुडौल बांध्यावर आपला जोडीदार भाळलेला असतो तोच बांधा लग्नानंतर जणू गायबच होऊ लागतो. लग्नानंतर पती-पत्नी दोघेही आपल्याला आता कोण पाहणार आहे? हा विचार करून स्वतःकडे लक्ष देणं सोडून देतात. जे की पूर्णतः चूक आहे. लग्नानंतर बऱ्याच मुली संसारातील जबाबदाऱ्या पूर्ण करता करता स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात आणि लठ्ठ होतात. तर दुसरीकडे आर्थिक म्हणा किंवा इतर कोणतं म्हणा असं टेन्शन घेऊन आणि बायकोच्या हातचं चमचमीत खाऊन मुलांचंही पोट सुटू लागतं.

# प्रेमविवाह : दोन कुटुंबांत ताळमेळ कसा बसवावा?

**जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या असतो तेव्हा प्रत्येकाला जोडीदाराची साथ हवी असते, यात शंका नाही. पण प्रेमानंतर आपलं नातं लग्नापर्यंत नेणं सोपं नसतं. आजही समाजात प्रेमविवाह स्वीकारणे बहुतांश कुटुंबीयांना कठीण जाते. पण मुलांच्या हट्टापायी आणि त्यांच्या आनंदासाठी घरातील सदस्य सहमती दर्शवतात, पण त्यांच्या मनात वेगळीच खदखद असते. अशा परिस्थितीत तुमच्या कुटुंबातील सदस्यांनी वरवरची सहमती दर्शवली असली तरी एकमेकांशी जुळवून घेणे त्यांच्यासाठी तितकेसे सोपे नसते. दोन कुटुंबांमध्येही मजबूत नाते तयार व्हायला खूप वेळ लागतो आणि काही वेळा लग्नाच्या काळात रुढी-परंपरेवरून वादही होतात. अशा परिस्थितीत मुलगा आणि मुलगी यांच्यासमोरही कठीण परिस्थिती निर्माण होते, कारण दोघांनाही सत्य माहिती असतानाही आपापल्या कुटुंबासाठी आपापसात भांडतात. इच्छा असल्यास जोडपे दोन कुटुंबांमध्ये मजबूत बंधन निर्माण करू शकतात, चला तर जाणून घेऊया यासंदर्भातील काही सोप्या टिप्स...**



- छोट्या छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा : प्रेमविवाहात एकमेकांना स्वीकारणे दोन कुटुंबांसाठी सोपे नसते. असे होऊ शकते की लग्नादरम्यान दररोज काही ना काही गोष्टी समोर येऊ शकतात आणि घरातील सदस्य एकमेकांबद्दल नाराजीही व्यक्त करतील. पण या सर्व छोट्या-छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करावे लागेल, तरच तुम्ही आपले नाते पुढे नेऊ शकाल. कुटुंबांमध्ये घट्ट नाते निर्माण करण्यासाठी जोडप्यांना त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष करावे लागते.
- कुटुंबातील सदस्यांची स्तुती करा : जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराच्या पालकांची भेट घ्याल तेव्हा त्यांना आपल्या कुटुंबातील सदस्याबद्दलची काहीतरी चांगली माहिती सांगा. त्यांना असे वाटू द्या की तुमचे कुटुंब त्यांना पूर्णपणे स्वीकारत आहे. जेव्हा तुम्ही दोघेही असा समजूतदारपणा दाखवून काम कराल, तेव्हा तुमच्या कुटुंबातील सदस्यांनाही एकमेकांशी बोलणे सोपे जाईल. अशा प्रकारे दोन्ही कुटुंबांमधील नातेही घट्ट होईल.
- पालकांचे म्हणणे स्वतःपुरतेच मर्यादित ठेवा : अनेक वेळा लग्नातील रीति-रिवाजांमुळे दोन कुटुंबात वाद निर्माण होऊ शकतात. या काळात तुमच्या पालकांमध्ये तणाव वाढण्यास अधिक वाव आहे. अशा परिस्थितीत जेव्हा जेव्हा तुमचे पालक तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबाबद्दल काहीही सांगतील तेव्हा त्याची माहिती स्वतःकडेच ठेवा. त्यामुळे कुटुंबांमध्ये कटुता निर्माण होणार नाही. जर तुम्ही तुमच्या घरातील प्रत्येक गोष्ट तुमच्या जोडीदाराला सांगितली तर त्यांच्या मनात तुमच्या कुटुंबाबद्दल फारशी चांगली भावना निर्माण होणार नाही. त्याच वेळी जेव्हा दोन्ही कुटुंबांना एकमेकांचे बोलणे कळते, तेव्हा त्यांच्यातही घट्ट बंध निर्माण करणे खूप कठीण होईल.
- दोन कुटुंबांत घडवून आणा संवाद : जेव्हा तुम्ही प्रेमविवाहाच्या दिशेने पाऊल पुढे टाकता तेव्हा तुम्हाला दोन कुटुंबांमध्ये मजबूत बंधन निर्माण करावे लागते. याचे कारण म्हणजे अरेंज्ड मॅरेजप्रमाणेच प्रेमविवाहात तुमचा कोणीही नातेवाईक हस्तक्षेप करण्यास येत नाहीत. अशा परिस्थितीत आपापल्या कुटुंबाची ओळख करून देणे आणि त्यांना एकमेकांशी बोलायला लावणे ही तुम्हा दोघांची जबाबदारी आहे. या काळात तुमच्या पालकांनाही थोडे शांत राहण्यास सांगा, जेणेकरून दोन्ही कुटुंबांना एकमेकांचे विचार आणि संभाषण समजू शकेल.

# मन जुळते तिथे वयाची कशाला चिंता?

**साधारणतः प्रेमविवाहात वयाची आडकाठी आणली जात नाही. परंतु ठरवून केलेल्या लग्नामध्ये वय महत्त्वाची भूमिका बजावते. लग्न म्हणजे दोन मनांचं, जिवांचं, कुटुंबाचं सुंदर मिलन आहे. जिथे दोन मनं जुळतात तिथे वय जुळणं गरजेचं नसतं. लग्नाच्या वेळेस वयातलं अंतर हे त्या जोडप्याच्या भविष्याचा विचार करून घेतलं जातं. पत्रिकांच्या जुळणाऱ्या गुणांपेक्षा दोन मनांचं, दोन विचारांचं जुळणं महत्त्वाचं असतं. नात्यांत असणारं प्रेम महत्त्वाचं आहे आणि जिथे प्रेम, सामंजस्य, आपुलकी असते तिथे वयाचं बंधन नसतं याबद्दल आजची तरुण पिढी काय म्हणते याचा घेतलेला वेध...**



## शेअरिंग होत नाही

वयामध्ये थोडं-फार अंतर असेल तर बिघडत नाही. पण हे अंतर एका पिढीइतकं मोठं असू नये. कारण प्रेम हे आंधळे असते. परंतु वयात जास्त अंतर असेल तर लग्न केल्यावर पुढे जाऊन जनरेशन गॅप जाणवू शकते. आचारविचारांतील फरकाचा त्रासही होऊ शकतो. आपल्या मनातलं शेअर करायला आपल्या वयाचीच व्यक्ती सर्वात जवळची वाटते. मग वयात खूप फरक असताना हे शेअरिंग कितपत होत असेल? काही वेळा वयात इतकं जास्त अंतर असेल, तर जेव्हा एक व्यक्ती वृद्धत्वाला येते तेव्हा दुसरी व्यक्ती त्यामानाने बऱ्यापैकी तरुण असल्याने उत्साहात असते. त्यामुळे जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षांचा भंग होऊ शकतो. दुसरं म्हणजे सेलिब्रिटींचं आयुष्य म्हणजे आदर्श असे काही जण मानतात. पण त्यांच्या आयुष्यावर एक नजर टाकली, तर ज्या सेलिब्रिटींच्या वयात पिढीइतके अंतर आहे त्यातील काही जणांचे पूर्वी लग्न होऊन घटस्फोटही झालेला आहे. काहींना तर मोठी मुलंही आहेत. अशा वेळी फक्त सेलेब्रिटींचं उदाहरण पुढे करून आकर्षणापोटी असलेल्या प्रेमाचं समर्थन करण्यापेक्षा अशा नात्याचा आपल्याला पुढे त्रास होणार नाही ना याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे.

**- चिन्मयी वझे, अभियांत्रिकी विद्यार्थिनी**

## मनं जुळणं महत्त्वाचं

मुलगी एकदा वयात आली की, घरी लगेच स्थळ बघण्याची, लग्नाची चर्चा सुरू होते. प्रत्येकजण आपापल्या पिढीप्रमाणे वेगवेगळी मतं व्यक्त करतो. मग त्यांच्याच मताशी सहमत होऊन मुलांना आपल्या आई-वडिलांच्या आज्ञेचं पालन करावं लागतं. पण आताचा दृष्टिकोन मात्र बदलला आहे. मुलं अगोदर आपल्या करिअरचा विचार करतात. त्यासाठी खूप शिकून आधी आपलं भविष्य उज्ज्वल करतात. हे सर्व करेपर्यंत त्यांचं वय हे २४-२५ च्या घरात जातं. त्यामुळे घरचे पूर्णपणे याला विरोध करतात. मुळात लग्न करताना वय हा मुद्दा महत्त्वाचा नसतोच. तेव्हा महत्त्वाचं असतं ते दोघांची मनं जुळून येणं. त्यासाठी पत्रिकांचे जुळणारे गुण महत्त्वाचे नसतात. जरी दोघांच्या वयात खूप फरक असला तरी आपण त्याकडे लक्ष न देता त्या दोघांमधील प्रेम, त्यांचं करिअर याला प्राधान्य देणं गरजेचं आहे. लोकांचं असं म्हणणं असतं की, वयामध्ये खूप अंतर असलेल्या जोडप्याचं लग्न यशस्वी होऊ शकत नाही. पण कधी-कधी मात्र असंही होतं की, दोघांचं योग्य वय असूनही, पत्रिका जुळूनही जोडप्याचं लग्न अयशस्वी होतं. म्हणूनच आई-वडिलांनी लग्नासाठी मुलांवर जबरदस्ती करू नये. कारण लग्नासाठी वय हा मुद्दा महत्त्वाचा नसतो.

**- कांचन गावस्कर, कॉमर्स विद्यार्थिनी**

## मनापासून, इच्छेने...

लग्न हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा क्षण असतो. लग्न झाल्यावर या नव्या नात्याला सुरुवात होते आणि आयुष्यातल्या एका नव्या टप्प्यात पती-पत्नीचा प्रवेश होतो. लग्नं जुळवली जातात, काही प्रेमविवाह करतात. सध्या प्रेमविवाहांचं प्रमाण वाढतं आहे. हल्ली तर वयात बरंच अंतर असलेली जोडपीसुद्धा लग्नाच्या बेडीत अडकत आहेत. मुळात लग्नासारख्या पवित्र गोष्टीला जात, धर्म, वंश, रंग, वय यांचं बंधन नसावं. जर दोन व्यक्तींची मनं एकमेकांशी जुळत असतील आणि त्या दोघांचं मनापासून एकमेकांवर प्रेम असेल तर वय, वंश आणि इतर गोष्टींचा विचार करण्याची गरजच नाही. लग्न हा आयुष्याला नवीन रंग देणारा क्षण असतो. ज्या दोन व्यक्तींचं लग्न होणार असतं त्या व्यक्तींचे विचार, त्यांचं सुख हे घटक महत्त्वाचे असतात. वयात अंतर असलेली अनेक जोडपी आज सुखाने संसार करत आहेत. लग्न हे मनापासून आणि इच्छेप्रमाणे झालं तर निश्चितच ते यशस्वी ठरतं. त्यामुळे वय, रंग, धर्म, जात या गोष्टींना अतिमहत्त्व देण्याची गरज नाही.

**- वैभव पुरव, कला शाखेचा विद्यार्थी**

## शॉर्ट न्यूज

### १९ लाखांचे टायर परस्पर विकले

■ **नगर :** टायर कंपनीने सांगितलेल्या पत्यावर टायर देण्याऐवजी कंटेनर चालकाने तब्बल १९लाखांचे टायर परस्पर विकले होते. मात्र हे टायर विकत घेण्याऱ्यासह त्याचा साथीदार बेल्हे गावात तांबेवाडी परिसरात टायर विक्री करण्याकरीता आला असता पोलिसांच्या सापळ्यात अडकले. एका कंटेनरच्या ड्रायव्हरने टायरची परस्पर विक्री केली होती. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. इरशाद निशार अहमद व अब्दुल कय्युम वहाब शाह यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून २ लाख ५२ हजार रुपये किंमतीचे १२ टायर जप्त करण्यात आले होते.

### महिलांचे दागिने चोरणारी टोळी जेरबंद

■ **राहुरी :** तालुक्यातील राहुरी फॅक्टरी परिसरात गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या उपस्थितीत सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अनेक छोट्या मोठ्या चोरीच्या घटना घडल्या आहे. चोरी करणाऱ्या चार महिलांची टोळी राहुरी पोलिस पथकाने कोंबीग ऑपरेशन करून गजाआड केली. केशर सुखदेव जाधव गवळण पांडुरंग गायकवाड (वय ४० रा. बीड), पुजा विशाल वाघमारे (वय २५ रा. खोकर माहे ता. शिरुर जि. बीड), पुजा विशाल मोहिते (वय २७ रा. साईतेज कॉलनी, नेवासा फाटा, ता. नेवासा) अशी ताब्यात घेतलेल्या महिलांची नावे आहेत.

### आई-वडिलांचा श्वास हृदयात जपा

■ **नेवासा :** सध्याच्या युगात आईच्या यातना व बापाचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून आई-वडिलांचा श्वास नेहमी हृदयात ठेवावा. मुलगा किंवा मुलीचे वाकडे पाऊल पडले, तर अंत्यसंस्काराच्या चितेवर जाण्यापूर्वीच बापाची घरात आणि मनात रोजच चिता जळत असते, असे विचार प्रसिद्ध व्याख्याते डॉ. वसंत हंकारे यांनी व्यक्त केले. सोनई (ता. नेवासे) येथे पसायदान-आनंदवन सेवाभावी संस्था व सुजाता इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने ''बाप समजून घेताना'' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हिंगोणी सेवा संस्थेचे अध्यक्ष शिवाजी सोनवणे होते.

### दोन मुलींवर अत्याचाराचा प्रयत्न

■ **अकोले :** तालुक्यात तीन दिवसांच्या कालावधीत शालेय अल्पवयीन मुलींवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याच्या दोन घटना घडल्या. काल घडलेल्या घटनेतील आरोपीला पोलिसांनी काही तासांत अटक केली अगस्ती कारखाना रस्त्यालगत घरातून. दुसऱ्या घटनेत मुळा खोऱ्यातील एका गावातील १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर आरोपीने अत्याचाराचा प्रयत्न केल्याची घटना घडली. अल्पवयीन मुलगी पायी घरी जात असताना आरोपी शुभम उर्फ तुकाराम शशिकांत निकाळे याने मुलीला बळजबरीने दुचाकीवर बसवून तिला लज्जा उप्पन्न होईल असे कृत्य केले.

### राजसाहेब तुम्ही मुंबईच्या बाहेर या

■ **संगमनेर :** संगमनेरच्या जनतेला परिवर्तन हवे होते. मतांच्या माध्यामतून जनतेने या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने खऱ्या अर्थाने परिवर्तन करून दाखविले आहे. कोणाच्या तरी सांगण्यावरून पराभवाचे विश्लेषण करण्यापेक्षा बाळासाहेब थोरात यांच्या पराभवाची खरी कारणे समजून घेण्यासाठी मनसे प्रमुख राजसाहेब तुम्ही मुंबईच्या बाहेर या, संगमनेर पाहा. मी तुम्हाला संगमनेरला आमंत्रित करतोय, असा खोचक टोला महायुतीचे आमदार अमोल खताळ यांनी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना लगावला आहे.

# राहूल गांधींनी हा जावई शोध कुठुन लावला?

**जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सवाल**



**राहाता : प्रतिनिधी**

**कोणतेही विधान करताना राहूल गांधी यांनी भान ठेवले पाहीजे. शिर्डीतील मतदार संख्येचा जावई शोध त्यांनी कुठुन लावला हाच खरा प्रश्न आहे.जनाधार गमावलेले नेते आता चुकीची विधान करून जनतेसमोर येण्याचा प्रयत्न करीत असल्याचा टोला जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला.**

राहूल गांधी यांनी शिर्डी मतदारसंघाच्या बाबतीत केलेल्या विधानावर माध्यमांशी बोलतांना विखे पाटील म्हणाले की,राज्यात आणि देशात भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या जनादेशाचे खरे दुख त्यांना आहे.जिल्ह्यातही सामान्य लोकांनी प्रस्थापितांना घरी बसवले याचा विसर राहूल गांधी यांना पडला असल्याचा टोला विखे पाटील यांनी लगावला.
ज्यांचा पराभव झाला त्यांनीच राहूल गांधी यांना चुकीची माहीती पुरवली का या प्रश्नावर बोलतांना विखे पाटील म्हणाले की,आपल्या अस्तित्वाच्या लढाईसाठी धडपड करीत आहेत.मात्र येणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही महायुतीचेच वर्चस्व राहील विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिर्डी मध्ये दुहेरी हत्याकांडाची घटना अत्यंत दुर्दैवी असून,वाढत्या लोकसंख्येचा विचार करता शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने कठोर उपाय योजना करण्याची गरज आहे.यासंदर्भात जिल्हा पोलीस प्रमुखांना सूचना देण्यात आल्या आहेत.पुढील आठवड्यात शहरात पुन्हा एकदा कोबिंग ऑपरेशन करून गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी पोलीस प्रशासनाने पावल उचलावीत.आजच्या घटनेत पोलीसांचा हलगर्जीपणा असेल तर त्यांच्यावरही कारवाई करण्याबाबत आदेश दिले असल्याचे ना.विखे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान सायंकाळी उशिरा मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत ग्रामस्थ आणि वरीष्ठ अधिकारी यांच्यात बैठक झाली.जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला संस्थानचे गोरक्ष गाडीलकर अतिरीक्त पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्गे, पोलीस उपअधिक्षक वमने पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतिष दिघे कैलास कोते विजय जगताप कमलाकर कोते सचिन शिंदे नितीन कोते आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.

ग्रामस्थांचे म्हणणे जाणून घेत स्थानिक पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या चुकांचाही आढावा घेण्यात आला.शहरात मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय छुप्या पध्दतीने सुरू असून याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली.
शहरातील पॉलिश
वाल्यावर तसेच रात्री उशिरा पर्यत शहरात फिरणाऱ्यांवर कारवाई बेकायदेशीर सुरू असलेल्या रिक्षांच्या कागदपत्रांची तपासणी करावी.स्थानिक पदाधिकर्यांनी अवैध धंद्याची माहीती गोपनिय माहीती पोलीस उपअधिक्षकांकडे द्यावी.मंदिर परिसरातील सुरक्षेसाठी असलेले पोलीस आता शहराच्या सुरक्षेसाठी वापरावेत.संस्थानने आता त्यांच्या परीसराची सुरक्षा यंत्रणा वापरण्याच्या सूचना ना.विखे पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या.

# महाराष्ट्र केसरी किताबाने वडीलांचे स्वप्न पूर्ण !

■ **महाराष्ट्र केसरी विजेता पैलवान पृथ्वीराज मोहोळ याची प्रतिक्रिया**
■ **पैलवान मोहोळने घेतले रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन**

**शिरुर : सतीश डोंगरे**

**वडिलांनी माझ्यासाठी खूप मेहनत घेतली त्यांच्यावरही अन्याय झाला होता त्यामुळे आपल्या मुलाने तरी महाराष्ट्र केसरी व्हावे हे त्यांचे स्वप्न होते ते मी पूर्ण केले याचा आनंद वाटतो, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र केसरी विजेता पैलवान पृथ्वीराज मोहोळ याने व्यक्त केली.**

रविवारी अहिल्यानगरमध्ये ६७ वा महाराष्ट्र केसरीचा थरारक अंतिम सामना पार पडला. या अंतिम सामन्यात पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळ याने सोलापूरचा पैलवान महेंद्र गायकवाड याचा पराभव करत महाराष्ट्र केसरीची मानाची चांदीची गदा जिंकली.

त्यानंतर आज सकाळी पैलवान पृथ्वीराज मोहोळ मानाच्या चांदीच्या गदेसह रांजणगावच्या महागणपतीच्या दर्शनासाठी आला होता. यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने मोहोळ याचा महागणपतीची प्रतिकृती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना पृथ्वीराज म्हणाला, महाराष्ट्र केसरी हे प्रत्येक पैलवानाचे स्वप्न असते तसे माझेही होते मी यासाठी गेले वर्षभर मेहनत घेत होतो माझ्या वडिलांनी माझ्यासाठी मोठे कष्ट घेतले त्याबरोबरच माझ्या वस्तादांनी माझ्यासाठी मेहनत घेतली आजारी असल्याने आज ते या स्पर्धेला उपस्थित राहू शकले नाही आज खऱ्या अर्थाने माझ्यावर प्रेम करणाऱ्या चाहत्यांची छाती अभिमानाने भरून आली आहे.

शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाड यांच्यात अंतिम लढत होईल असा अनेकांचा तर्क होता मात्र तो चुकीचा ठरला पुणे जिल्ह्याला आणि त्यातली त्यात मुळशी तालुक्याकडे बऱ्याच वर्षांनी महाराष्ट्र केसरीची मानाची गदा आली आहे. आमचे चुलते सगळे पैलवान आहेत त्यांचे मोठे मार्गदर्शन मला मिळाले. असे यावेळी बोलताना पै. मोहोळ याने सांगितले.
काल महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या वेळी झालेल्या गोंधळाच्या परीस्थिती वर तसेच त्यानंतर पैलवान महेंद्र गायकवाड याच्यावर झालेल्या कारवाईबाबत बोलण्यास मात्र पैलवान पृथ्वीराज मोहोळ यांनी नकार दिला.

# सत्यजित तांबे यांना आदर्श युवा आमदार पुरस्कार प्रदान

**जाधव ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने सन्मान**

**पुणे : प्रतिनिधी**

**विद्यार्थी व तरुणांसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवणारे विधान मंडळातील अभ्यासू युवक लोकप्रतिनिधी आणि नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांना यावर्षीच्या आदर्श युवा आमदार पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.**

पुणे येथे जाधव ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात आमदार सत्यजित तांबे यांना आदर्श युवा आमदार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार हेमंत पाटील, आमदार कैलास पाटील, मनसे नेते गजानन काळे, युवा नेते शार्दुल जाधव यांच्यासह पुणे येथील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

युवक चळवळीच्या माध्यमातून सत्यजित तांबे यांनी राज्यभर कार्यकर्त्यांचे मोठे जाळे निर्माण केले आहे. चांदा ते बांदा अशी कार्यकर्त्यांची मोठी फळी असून नाशिक पदवीधर



मतदारसंघातून निवडणूक लढवल्यानंतर शिक्षक ,वकील, डॉक्टर, इंजिनिअर, बेरोजगार, अंगणवाडी सेविका, शेतकरी ,शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांच्या विविध प्रश्नांबाबत आमदार तांबे यांनी सातत्याने विधान परिषदेत आवाज उठवला आहे.

याचबरोबर युवकांच्या कला व क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी जिल्हास्तरावर भव्य क्रीडा संकुलासह तालुका स्तरावर विविध गावांमधून लायब्ररी सुरू करण्यासाठी प्राधान्य दिले आहे. यामधून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व इतर अभ्यासाकरता मोठी संधी उपलब्ध होणार आहे. युवकांसाठी सातत्याने झटणारा नेता अशी आमदार सत्यजित तांबे यांची ओळख असून विविध भाषांवरील प्रभुत्व , विविध विषयांचा अभ्यास यामुळे महाराष्ट्रात त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे.

हा पुरस्कार मिळाल्यानंतर आमदार तांबे म्हणाले, स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांवर आपण समाजकारण करत असून माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, व आई दुर्गाताई तांबे यांचे मार्गदर्शन आपल्यासाठी मोलाचे राहिले आहे. यापुढील काळातही महाराष्ट्रातील युवकांसाठी राजकारण विरहित सातत्याने काम करण्यासाठी आपले पहिले प्राधान्य राहील असे ते म्हणाले.

**वाचकांच्या लेखणीतून**

# मशिदीतील नमाजींचा आदर्श घ्यावा



२ फेब्रुवारी रविवार रोजीच्या मुंबईच्या सकाळ दैनिकामध्ये हेरंब मंदिरात भक्तांसाठी ड्रेस कोड अशी धार्मिक क्षेत्रातील बातमी वाचली. काही दिवसांपूर्वी मुंबईमधील सिद्धिविनायक मंदिराने भाविकांसाठी ड्रेस कोड लागू केला होता. याला अनुसरून ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमधील हेरंब मंदिरातही भाविकांसाठी ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. असे कळते. या निर्णयाचे आपण स्वागतच केले पाहिजे. २४ मे २०२3 रोजीच्या पारनेर दर्शनमध्ये अन्यथा हिंदू मंदिरांचे पिकनिक स्पॉट बनतील! या मथळ्याचा माझा एक लेख प्रकाशित झाला होता. रांजणगाव गणपती देवस्थानने त्यावेळी तेथील मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय घेतला होता. पण नंतर विरोधकांच्या गदारोळामुळे तो निर्णय मागे घेण्यात आला तो मागे घेऊ नये. यासाठी मी हा लेख लिहिला होता. विशेष म्हणजे माझा हा लेख रांजणगाव गणपती देवस्थानला पोहोचल्याचेही खाजगीरीत्या कळले होते. कदाचित त्यांच्या रेकॉर्डमध्ये सदर लेखाची नोंदही सापडेल.
या लेखात मी लिहिले होते, ही आमच्या वैयक्तीक आणि धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आहे हे (विरोध करणारे) मनमौजी अशीही आरडाओरड करतील! पण स्वातंत्र्य म्हणजे काय? जगात निर्भेळ स्वातंत्र्य नावाची चीजच नाही! रस्त्यात मला काठी फिरविण्याचा अधिकार आहे. त्याचबरोबर इतरांना त्यामुळे इजा होणार नाही हेही माझे कर्तव्य आहे. यातून ही (विरोधक/मनमौजी) मंडळी काही बोध घेतील?
थोडक्यात,.....भारतातल्या कुठल्याही देवस्थानने या बाबतीत कच खाऊन कसे चालेल? अन्यथा हिंदू मंदिरांचे पिकनिक स्पॉट बनतील!
सगळ्या भारतीय हिंदू मंदिरांमध्ये भाविकांना ड्रेस कोड लागू केलाच पाहिजे! या बाबतीत मशिदीत नमाज पढण्यासाठी जाणाऱ्या भाविकांचा (नमाजींचा) आदर्श आपणही घ्यावा. अर्थात तत्सम हिंदू पध्दतीचा पेहराव करावा. ते उचित होईल.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# राहुल शिंदे यांचा राज्यपालांकडून सन्मान

**सामाजिक कार्याची दखल | सी.एस.आर.सुमित पुरस्कार प्रदान**

**पारनेर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील रांजणगाव मशिद येथील व पारनेर तालुका भाजपा अध्यक्ष राहुल शिंदे यांना विविध सामाजिक कार्याबद्दल राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते सी.एस.आर सुमित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**

मुंबई येथील आईटीसी पार्क सभागृहात झालेल्या सभारंभात हा सन्मान करण्यात आला.यावेळी बजाज उद्योग समुहाचे सुशिल बजाज,डॉ. सिमा सिंग उपस्थित होत्या.
राहुल शिंदे यांनी अण्णा हजारे युवा मंचाच्या माध्यमातून सुपे पोलीस ठाणे मंजुरी, परिसरातील विविध रस्त्यांसाठी मंजुरी मिळविणे, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या विविध आंदोलनात सहभाग,विविध विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या दाखले सह इतर मागण्यांसाठी आंदोलने,कृषी क्षेत्रात योगदान देत एकाच वेळी गावातील शंभर शेततळे मंजुर करणे, जलसंधारणामध्ये उल्लेखनीय कार्य, भूमिअभिलेख कार्यालयातील मोजणी




सह इतर कामांना होणारी आर्थिक लुट यांसह इतर प्रलंबित कामांसाठी उपोषण करत तेथील अनेक प्रश्न मार्गी लावणे या सर्व बाबींचा विचार करत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

शिंदे यांच्यासह सारा सचिन तेंडुलकर,इंडियन ऑईल,जे.एस.डब्ल्यू यांसह अन्य सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांसह कंपनींचा सन्मान करण्यात आला.या पुरस्काराबद्दल राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील,आमदार काशिनाथ दाते यांनी अभिनंदन केले.

## (पान १ वरून) चारचाकीवाल्या लाडक्या बहिणींची चौकशी!

राज्यातील सर्वात लोकप्रिय योजनेपैकी एक आहे. या योजनेअतंर्गत राज्यातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. मात्र या अनेक अपात्र महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा महिलांना योजनेतून बाहेर काढण्यासाठी अर्जांची पडताळणी सुरु आहे. यासाठी काही निकष लावले जात आहेत. चारचाकी वाहन असणाऱ्या कुटुंबातील महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या महिलांच्या कुटुंबात चारचाकी वाहन असेल त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार नाही.
चौकट
योजनेचे काही निकष - ज्या महिलांचे कुटुंब आयकर भरते अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या महिलांकडे चारचाकी वाहन आहे, ते अपात्र ठरणार आहेत. तसेच इतर सरकारी योजनेचा लाभ घेत असणाऱ्या महिलांना फक्त फरकाची रक्कम मिळेल. ज्या महिलांच्या बँक खात्यावरील नाव आणि आधार कार्डवरील नाव वेगवेगळे आहे, अशा महिला देखील अपात्र होणार आहेत. ज्या महिला लग्न करून परराज्यात स्थायिक झाल्या आहेत अशा महिलांनाही आता या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
**फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार?**
लाडकी बहीण योजनेचे आतापर्यंत सात महिन्यांचे एकूण १० हजार ५०० रुपये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. आता फेब्रुवारी महिन्याचा हप्ता पात्र बहिणींच्या बँक खात्यात जमा होणार आहे. आतापर्यंत प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेनंतर हप्त्याचे वितरण सुरू होते. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याचा हप्ता सुद्धा १५ तारखेनंतर मिळण्याची शक्यता आहे.

# २५ वर्षांपूर्वी पाहिलेलं स्वप्न पुर्ण झालं!

## सासुरवाडीतील सत्काराने काशिनाथ दाते भावूक




■ पाबळ येथे आमदार काशिनाथ दाते यांच्या सपत्नीक नागरीक सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

**पाबळ : प्रतिनिधी**

**राजकीय क्षेत्रात काम करताना आपणही राज्याच्या विधिमंडळात जावं असं २५ वर्षांपूर्वी पाहिलेलं स्वप्न आज पुर्ण झाल्याचे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले. लग्नानंतर ५१ व्या वर्षी पुन्हा लग्न झाल्याचा मला अभास होतोय असे सांगताना सासुरवाडीच्या सत्काराने आमदार काशिनाथ दाते हे भावूक झाले.**

पाबळ या आ. काशिनाथ दाते यांच्या सासुरवाडीमध्ये त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यावेळी आ. दाते यांनी सासुरवाडीकरांची कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, माझ्या विजयामध्ये महिला भगिनींचे मोठे योगदान आहे. राजकीय क्षेत्रात काम करताना माझ्या पत्नीने मला खंबीर साथ दिली. निवडणूका लढविल्या जय, पराजय झाला मात्र पत्नीने कधी नाराजी व्यक्त केली नाही अथवा विजय झाल्यानंतर कधी हूरळूनही गेली नसल्याचे सांगत दाते यांनी पत्नीच्या योगदानाची आपल्या भाषणात दखल घेतली.

दाते पुढे म्हणाले, राजकारण करत असताना आपण नेहमीच नाती गोती जपली. विविध निवडणूकांमध्ये नातेवाईकांनीही झोकून देत काम केले. तुमचा जावई जिल्हा परिषदेत असताना डोंगराऐवढे काम झाले आता तर विधिमंडळात गेल्याने कामांची चिंता करू नका. पाण्याच्या प्रश्नापासून आपण कामाला सुरूवात केली असून हे काम झाल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही. पाण्याच्या प्रश्नावर अनेक निवडणूका लढविल्या गेल्या. मात्र निवडणूकीनंतर या प्रश्नावर कोणीही काम केले नाही. योगायोगाने राधाकृष्ण विखे पाटलांकडे जलसंपदा खात्याचे मंत्रीपद असून केंद्र व राज्यात एकाच विचारांचे सरकार आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यात आपणास निश्चित यश मिळेल असा विश्वास दाते यांनी व्यक्त केला.

यावेळी मधुकर उचाळे, अशोक सावंत, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, प्रभाकर कवाद, विक्रम कळमकर, सुषमा रावडे, दिलीप दाते, सचिन वराळ, भास्कर उचाळे, पंकज कारखिले, सुधामती कवाद, संग्राम पावडे, मंगेश दाते, राजेंद्र औटी, अश्विन कोल्हे, विकास रोकडे, पांडूरंग येवले, डॉ. कोमल भंडारी, भीवसेन येवले, सुधामती कवाद, रमेश वाजे, अर्चना गिरी, अक्षय गोरडे आदी यावेळी उपस्थित होते. शिवराज कदम यांनी सुत्रसंचलन तर ज्ञानदेव गोरडे यांनी आभार मानले.

### आता मीच वकील झालोय !

**पाणी प्रश्नावर आजवर अजितदादा पवार, राधाकृष्ण विखे तसेच विविध अधिकाऱ्यांसमवेत बैठका झाल्या आहेत. सर्वेक्षण होऊन निविदा प्रक्रियाही सुरू झाली आहे. पूर्वी मी नेहमीच वकीली करायचो आता मीच वकील झालो असल्याने कामांची चिंता करू नका. अजित पवार यांचे आपल्यावर प्रेम आहे. त्यांच्या माध्यमातून आपण कामे मार्गी लाऊ असा विश्वास आ. दाते यांनी व्यक्त केला.**

# फुले, शाहू ,आंबेडकरांचे आदर्श पुढे नेऊ

## प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

**जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेला एकशे सात वर्षांची परंपरा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी संस्था काम करत असून फुले, शाहू ,आंबेडकरांच्या विचारांना पुढे नेण्याची जबाबदारी महाविद्यालयातील सर्व घटकांची असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले.**




■ पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून पुन्हा सुत्रे स्विकारल्यानंतर डॉ. रंगनाथ आहेर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ आहेर यांनी सत्कारास उत्तर दिले.

डॉ. आहेर यांनी पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून पुन्हा पदभार स्विकाल्यानंतर महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत हेते. उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना डॉ. आहेर म्हणाले, महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व प्रशासकीय सेवकांनी काम करताना आपसामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये योग्य सुसंवाद ठेवावा. विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी समजावून घ्याव्यात. अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा. महाविद्यालयाला मागील कालखंडात नॅकचा ए प्लस प्लस दर्जा प्राप्त झालेला आहे. तो टिकविण्याची जबाबदारी सर्व घटकांची आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी पुढील काळात आपणास खुप काम करायचे असल्याचे डॉ. आहेर म्हणाले.

शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक कटीबध्द आहेत. पुढील कालखंडात महाविद्यालयाचा लौकिक वाढविण्यासाठी प्रत्येकजण योगदान देईल. आपले महाविद्यालय एका उंचीवर नेउन ठेऊ. डॉ. तुकाराम थोपटे,उपप्राचार्य

यावेळी डॉ. दिलीप ठुबे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, अंतर्गत गुणवतता सिध्दता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, प्रा. संजय कोल्हे, सावकार काकडे यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते. डॉ. दत्तात्रय घुंगार्डे यांनी प्रास्ताविक तर डॉ. हरेश शेळके यांनी आभार मानले.

# श्री.मुलिका देवी विद्यालयात हळदी कुंकू समारंभ उत्साहात

## महिलांच्या उखाण्यांनी आणली कार्यक्रमात रंगत



**निघोज : प्रतिनिधी**

**येथील श्री. मुलिका देवी विद्यालयात हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. महिला भगिनींनी घेतलेल्या मजेशीर उखाण्यांनी कार्यक्रमात रंगत वाढविली.यावेळी अनेक महिला पालक उपस्थित होत्या.**

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जगदाळे,उपमुख्याध्यापक शिंदे,पर्यवेक्षक इंगळे,ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद , पत्रकार निलमताई खोसे, सुंदर हारदे धोंगडे ताई तसेच अनेक महिला माता-भगिनी उपस्थित होत्या.

सुधामती कवाद यांनी आपल्या मनोगतातून संस्कृती कशी जोपासली जाते याचे मार्गदर्शन केले त्याचबरोबर त्यांनी विद्यालयासाठी ज्या काही साहित्यांची आवश्यकता आहे ते साहित्य पुरवण्याचे आश्वासन दिले.

मुख्याध्यापिका श्रीमती जगदाळे यांनी महिलांना आपल्या पाल्याची आपण कशा प्रकारे संवाद साधायला हवा असे मोलाचं मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक विद्यालयाच्या श्रीमती दिघे केले तर श्रीमती इनामदार,श्रीमती सोनवणे श्रीमती लहारे यांनी आलेल्या महिलांचे स्वागत , हळदी कुंकू व वाण वाटप केले . श्रीमती पोटे मॅडम यांनी हळदी कुंकवाचे महत्व सांगितले. महिलांनी देखील कार्यक्रमाला उखाणे घेऊन रंगतदार आणली. श्रीमती काळे यांनी आभार मानले तर सुत्र संचालन वराळ यांनी केले.

# समाजातील प्रश्न कवितेतून व्यक्त होतात !

## ज्येष्ठ कवी संजय पठाडे यांचे प्रतिपादन




**अळकुटी : प्रतिनिधी**

**समाजातील अनेक ज्वलंत प्रश्न कवी आपल्या कवितेमधून शब्दबद्ध करत असतो. महिलांचे प्रश्न, शिक्षणाची अवस्था, सामाजिक कार्य, लेखन वाचनाची आवड, समाजातील गंभीर प्रश्न, राजकीय भाष्य असे एक ना अनेक नानाविध पद्धतीने कवी आपल्या कवितेमधून व्यक्त होत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ कवी संजय पठाडे यांनी केले.**

अळकुटी येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात काव्यसंध्या या कार्यक्रमात संजय पठाडे यांनी आपले मत व्यक्त केले.

काव्यसंध्या या कार्यक्रमात पारनेर महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. हरेश शेळके, निघोजच्या श्री. मुलिकादेवी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण जाधव, निघोज येथील प्रसिद्ध कवी संदीप राठोड, राळेगण येथील कवी साहेबराव घुले आदी कवींनी आई वडिलांचे कष्ट, विद्यार्थ्यांना प्रेरणादायी कविता, देशभक्तीपर कविता, सामाजिक कविता, प्रेम कविता या विषयावरील कवितेची मेजवानी दिली. या कवितांना विद्यार्थी व महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी भरभरून दाद दिली.

कवी संमेलन प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. पानमंद सर, माजी प्राचार्य अर्जुन चाटे सर, प्रा.गोर्डे सर प्रा.दिवटे मॅडम प्रा.थोरात मॅडम साईनाथ विद्यालयाचे पाचर्णे सर , प्राध्यापक विशाल रोकडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी आयान तांबोळी या विद्यार्थाने आपल्या वडिलांवर केलेली कविता सादर केली.

# बासरी वादनाच्या मैफलीत प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध !

## नवोदय विद्यालयात स्पीक मॅके संस्थेच्या वतीने आयोजन

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिबद्ध असलेल्या येथील पी .एम.श्री जवाहर नवोदय विद्यालयात विद्यालय समिती तसेच संभागीय कार्यालय पुणे द्वारा आयोजित स्पीक मॅके या भारतीय वारशाच्या अमूर्त पैलूंना प्रोत्साहन देणाऱ्या भारतीय वारशाच्या विविध पैलूंबद्दल जागरूकता वाढवून त्यात अंतर्भूत मूल्य आत्मसात करण्यासाठी, युवा पिढीला प्रेरणा देऊन औपचारिक शिक्षणाची गुणवत्ता समृद्ध करण्याचा मानस ठेवून कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने आयोजित बासरी वादन कार्यक्रम संपन्न झाला.**




कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन तसेच कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रख्यात बासरी वादक पंडित राजेंद्र कुलकर्णी,तबलावादक श्री.श्रीकांत भावे तसेच सहा.बासरी वादक शुभम चौडे या मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत पं.राजेंद्र कुलकर्णी यांनी राग भिमपलासी ताल झपताल तीन ताल, राग देश उपशास्त्रीय धून वाजवून आपल्या बासरीतील अद्वितीय सुरांनी सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व इतर सर्वच प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या बासरी वादनानंतर काही विद्यार्थ्यांनी त्यांना स्पीक मॅकेच्या बोधचिन्हाचा अर्थ ? आपणास बासरी वादनाची प्रेरणा कशी व कुठून मिळाली? तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासात संगीताची मदत कशी होईल? असे प्रश्न विचारण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना पंडित राजेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की स्पीक मॅके संस्थेचे प्रतीक हे भारताच्या सांस्कृतिक वारशाचे, संगीत नृत्य व इतर कलांची गहनता दर्शवते. शास्त्रीय संगीताच्या श्रवणाची मदत अभ्यासात मन एकाग्र करण्यास निश्चितपणे होऊ शकते असेही त्यांनी सांगितले.

विद्यालयाचे प्राचार्य समाधान बोरसे यांनी अतिथींचे स्वागत केले व उपप्राचार्य जी.बी.मुन्नारवार यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.हा कार्यक्रम विद्यालयाच्या सांस्कृतिक परंपरेतील एक संस्मरणीय क्षण ठरला.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यभान लांडगे यांचे निधन

## विठ्ठलराव लांडगे यांना पितृशोक

**नगर : प्रतिनिधी**

**पिंपळगाव लांडगा (ता. अहिल्यानगर) येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व प्रगतीशील शेतकरी सूर्यभान सावळेराम लांडगे (वय ८४) यांचे मंगळवारी (दि. ४) वृद्धापकाळाने निधन झाले.**

त्यांच्या पश्चात दोन मुलगे, एक विवाहित मुलगी, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्ष व दै. लोकआवाजचे मालक-संपादक विठ्ठलराव लांडगे, जिल्हा ऑडिटर संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग लांडगे यांचे वडील तसेच अहिल्यानगर इलेक्ट्रीकल डिलर्स असोशिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब परभणे यांचे ते सासरे होत.



पिंपळगाव लांडगा आणि परिसरात सूर्यभान लांडगे यांचा सामाजिक आणि धार्मिक कामात सहभाग होता. अनेक वर्षे त्यांनी पंढरपूर वारी दर्शन नियोजन सक्रिय सहभाग घेतला. सुरवातीच्या काळात प्रतीकुल परिस्थितीशी संघर्ष करत त्यांनी यशस्वी कुटूंब घडवले. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक, प्रतिष्ठित लोक उपस्थित होते.

# सरोजिनी दीक्षित यांचे निधन

**पारनेर : प्रतिनिधी**

**जुन्या पिढीतील पोस्टमास्तर स्व.दत्तात्रेय दीक्षित यांच्या पत्नी सरोजिनी दीक्षित यांचे नुकतेच निधन झाले.त्या ८६ वर्षांच्या होत्या.**



धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग असे.एअर इंडियातील अभियंता नितीन दीक्षित तसेच विनय व वल्लभ दीक्षित यांच्या त्या मातोश्री होत.त्यांच्या मागे मुलगी,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वरदविनायक गणेश मंडळाच्या कार्याचे अनुकरण करावे

## बाबा महाराज खामकर यांची अपेक्षा

**निघोज : प्रतिनिधी**

**धार्मिक संस्कृती सर्वाधिक महत्वाची असून निघोज व परिसरात वरदविनायक गणेश मंडळाचे कार्य कौतुकास्पद असून मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच तनपुरे वस्ती येथील ग्रामस्थ संघटीतपणे धार्मिक कार्यात सहभागी होतात याचे अनुकरण इतरांनी करण्याची गरज असल्याची अपेक्षा बाबा महाराज खामकर यांनी व्यक्त केली. गणेश जयंती उत्सव निमित्ताने आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता खामकर महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आली यावेळी ते बोलत होते. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ यांच्या हस्ते खामकर महाराज यांचा सत्कार करण्यात आला.**



यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त अनिल लंके, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पत्रकार संघाचे शहराध्यक्ष आनंद भुकन, बाबाजी तनपुरे, शिवाजी लाळगे, निवृत्ती महाराज तनपुरे, दिलीप लाळगे , काळे सर, बाळासाहेब लाळगे, सविता तनपुरे, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेली तीन दिवसांत श्रीहरी महाराज पवार, तुषार महाराज गुंड, ज्ञानेश्वर महाराज रासकर,बाबा महाराज खामकर आदिची किर्तने झाली. गणेश जयंती निमित्त परिसरात मिरवणूक काढण्यात आली होती तसेच मंदीरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले केंद्र व राज्य सरकार आपल्या विचाराचे असल्याने तसेच आमदार काशिनाथ दाते सर हे विकासाभिमुख नेतृत्व असल्याने येत्या वर्षभरात सभामंडप व दिलेले आश्वासन पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे. बाबा महाराज खामकर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण किर्तन केले असून त्यांना दिलेले मानधन हे ते समाजासाठी वापरत असल्याने आपल्या तालुक्यातील किर्तनकार म्हणून त्यांचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त अनिल लंके यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी बाबाजी तनपुरे यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com